# श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था (शिर्डी)

**सभा क्र.६/२०२६** **दिनांक ०४/०८/२०२६**

**स्थळ- जिल्हा न्यायालय,अहिल्यानगर** **वेळ- दुपारी ०३.०० वा.**

**मा.उच्च न्यायालय, मुंबई खंडपीठ औरंगाबाद येथील जनहित याचिका नं.९८/२०२१ व (सिव्हील अॅप्लीकेशन नं.११९७३/२०२१) यावर दि.१३/०९/२०२२ रोजी मा.न्यायालयाने दिलेल्या आदेशान्वये श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी करिता नियुक्त केलेल्या तदर्थ (Ad-hoc) समितीची सभा मंगळवार दि.०४.०८.२०२६ रोजी दुपारी ०३.०० वा. मिनी कॉन्फरन्स हॉल, जिल्हा न्यायालय, अहिल्यानगर येथे आयोजित करणेत आली असलेबाबत इकडील जा.नं.एसएसएस/वशी-०४/१७०१/२०२६ दि.०१.०८.२०२६ रोजीचे पत्रान्वये सर्व मा.सदस्यांना कळविण्यात आलेले होते.**

**त्यानुसार तदर्थ (Ad-hoc) समितीची सभा मंगळवार दि.०४.०८.२०२६ रोजी दुपारी ०३.०० वा. मिनी कॉन्फरन्स हॉल, जिल्हा न्यायालय, अहिल्यानगर येथे मा.श्री. शिवाजी कचरे, प्रमुख जिल्हा व सत्र न्यायाधीश, अहिल्यानगर यांचे अध्यक्षतेखाली सुरु करण्यात आली.**

**या सभेस खालील मा.सदस्य उपस्थित होते.**

**मा.श्री. शिवाजी कचरे,
प्रमुख जिल्हा व सत्र न्यायाधीश, अहिल्यानगर तथा
अध्यक्ष, तदर्थ (Ad-hoc) समिती,
श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी.**

**मा.डॉ.पंकज आशिया, भा.प्र.से.
जिल्हाधिकारी, अहिल्यानगर तथा
सदस्य, तदर्थ (Ad-hoc) समिती,
श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी.**

**मा.श्री. गोरक्ष गाडीलकर, भा.प्र.से.
मुख्य कार्यकारी अधिकारी तथा
सदस्य, तदर्थ (Ad-hoc) समिती,
श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी.**

---

**विषय नं.१ दि.०७.०७.२०२६ रोजी अहिल्यानगर येथे झालेल्या मा.तदर्थ (Ad-hoc) समिती सभेचे इतिवृत्त वाचून कायम करणे.**

**निर्णय क्र.२९९ दि.०७.०७.२०२६ रोजी अहिल्यानगर येथे झालेल्या मा.तदर्थ (Ad-hoc) समिती सभेचे इतिवृत्त वाचून कायम करण्यात आले.**

**(कार्यवाही-सभा कामकाज विभाग)**

---

**विषय नं.२ चक्रिय पध्दतीने मान्यता दिलेले विषय वाचून कायम करणे.**

**१. आर्थिक वर्ष सन २०२६-२७ मधील २ तिमाही व सन २०२७-२८ या आर्थिक वर्षाकरीता आयकर (TDS) व जीएसटी (GST) विषयक कामकाज करणेकामी, कर सल्लागार नेमणुक करणेकामी पात्र लेखापरिक्षक संस्थांच्या फी चा तुलनात्मक तक्ता निर्णयार्थ मा.तदर्थ समितीपुढे सादर करणेबाबत.**

**निर्णय क्र.३००/१ चक्रिय पध्दतीने घेण्यात आलेल्या निर्णयाचे अवलोकन करुन निर्णय कायम करण्यात आला.**

**(कार्यवाही-लेखाशाखा)**

---

**२. श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी यांच्या साई उद्यान इमारतीसाठी कंपाऊंड वॉलचे बांधकाम करणे, ड्रेनेज व पावसाच्या पाण्याच्या वाहिन्या टाकणे तसेच सेप्टीक टँकच्या आर.सी.सी. भिंतीची दुरुस्ती करणेसाठी प्राप्त ई-निविदांपैकी निम्नतम निविदाधारक किंगडम इंजिनियर्स अॅन्ड कॉन्ट्रक्टर्स, पुणे यांची रु.१३,५८,१२१/-मात्रची ई-निविदा स्विकारुन त्यांना कार्यादेश देणेबाबत.**

**निर्णय क्र.३००/२ चक्रिय पध्दतीने घेण्यात आलेल्या निर्णयाचे अवलोकन करुन निर्णय कायम करण्यात आला.**

**(कार्यवाही-बांधकाम विभाग)**

---

**विषय नं.३ सन २०२६-२७ करीता श्री साई प्रसादालयात मनुष्यबळाव्दारे चपाती/पुरी तयार करणेकामी मागविणेत आलेल्या ई-निविदेतील प्राप्त न्युनतम दराबाबत निर्णय होऊन कार्यादेश देणेबाबत.**

**निर्णय क्र.३०१ प्रस्ताव मंजूर.**

**(कार्यवाही-श्री साई प्रसादालय)**

---

**विषय नं.४** **सन २०२६-२७ करीता श्री साई प्रसादालयामार्फत मनुष्यबळाव्दारे अन्नपाकीटे (नाष्टापाकीटे) तयार करणेकामी मागविणेत आलेल्या ई-निविदेतील प्राप्त न्युनतम दराबाबत निर्णय होऊन कार्यादेश देणेबाबत.**

**निर्णय क्र.३०२ प्रस्ताव मंजूर.**

**(कार्यवाही- श्री साई प्रसादालय)**

---

**विषय नं.५** **सन २०२६-२७ करीता श्री साई प्रसादालयातील हाऊसकिपींग, स्वच्छता व पेस्टकंट्रोलचे काम तसेच दररोज वाढपी व हाऊसकिपींगचे कामाकरीता आऊटसोर्स पध्दतीने कामगार पुरविणेकामी मागविणेत आलेल्या ई-निविदेतील निम्नतम दरधारक यांना कार्यादेश देणेस मान्यता मिळणेबाबत.**

**निर्णय क्र.३०३ प्रस्ताव मंजूर.**

**(कार्यवाही- श्री साई प्रसादालय)**

---

**विषय नं.६** **सन २०२५-२६ या आर्थिक वर्षातील श्री साई प्रसादालयातील धान्य-कडधान्य व किराणा मालाचा घट-तुटीबाबतचा अवलोकनार्थ अहवाल.**

**निर्णय क्र.३०४ नोंद घेतली.**

**(कार्यवाही- श्री साई प्रसादालय)**

---

**विषय नं.७** **प्रसादालय विभागासाठी माहे जुलै-२०२६ ते मार्च-२०२७ या कालावधीसाठी तांदूळ खरेदी कामी फेर ई-निविदा प्राप्त न्युनतम दरधारकास पुरवठा आदेश देणेबाबत.**

**निर्णय क्र.३०५ प्रस्ताव मंजूर.**

**(कार्यवाही-खरेदी विभाग)**

---

**विषय नं.८** **संस्थानचे लाडू निर्मिती, मंदिर व प्रसादालय विभागांसाठी गाईचे शुध्द तूप खरेदीकामी सन २०२६-२७ चे ई-निविदा प्राप्त न्युमतम दरधारक यांना पुरवठा आदेश देणेबाबत.**

**निर्णय क्र.३०६ प्रस्ताव मंजूर.**

**(कार्यवाही- खरेदी विभाग)**

---

**विषय नं.९** **सन २०२६-२७ या कालावधीसाठी पॅकेज्ड ड्रिंकिग वॉटर ०१ लिटर पुरवठा बंद केलेबाबत.**

**निर्णय क्र.३०७ फक्त अनामत रक्कम जप्त करण्यात यावी.**

**(कार्यवाही- खरेदी विभाग)**

---

**विषय नं.१०** **कॅन्टीन विभागासाठी सन २०२६-२७ या कालावधीसाठी पॅकेज्ड ड्रिंकिंग १ लिटर वॉटर बॉटल खरेदी कामी ई-निविदा प्राप्त न्युनतम दरधाकास पुरवठा आदेश देणेबाबत.**

**निर्णय क्र.३०८** **प्रस्ताव मंजूर.**

**(कार्यवाही- खरेदी विभाग)**

---

**विषय नं.११** **सन २०२६-२७ करीता बुंदी प्रसाद तयार करून उत्पादन तारखेचे शिक्के मारून संस्थानचे मागणीप्रमाणे पॅकींग (हाताळणी/मशिनव्दारे) करणे व पॅकींग बुंदी पाकीटे संस्थान वाहनाने काऊंटर पर्यंत पोहोच करणे इ. कामी मागविणेत आलेल्या ई-निविदांमधील न्युनतम (L1) दरधारक श्री साई केटरर्स, श्रीरामपुर यांना कार्यादेश दिल्यापासून १ वर्ष कालावधीकरीता कार्यादेश देणेस मान्यता मिळणेबाबत.**

**निर्णय क्र.३०९** **प्रस्ताव मंजूर.**

**(कार्यवाही-लाडू व बर्फी प्रसाद निर्मिती विभाग)**

---

**विषय नं.१२** **सन २०२६-२७ करीता मोतीचुर बुंदी लाडू प्रसाद तयार करुन उत्पादन तारखेचे शिक्के मारुन संस्थानचे मागणीप्रमाणे हाताने/मशिनने पॅकींग करणे व पॅकींग लाडू पाकीटे संस्थान वाहनाने काऊंटरपर्यंत पोहच करणे व बर्फी प्रसाद तयार करुन देणे इ. कामी मागविणेत आलेल्या ई-निविदामधील निम्नतम (L1) दरधारक श्री साई केटरर्स, श्रीरामपूर यांना कार्यादेश दिल्याचे तारखेपासून एक वर्ष कालावधीकरीता कार्यादेश देण्यास मान्यता मिळणेबाबत.**

**निर्णय क्र.३१०** **लाडू प्रसाद बनविणेचा प्रस्ताव मंजूर.**

**(कार्यवाही- लाडू व बर्फी प्रसाद निर्मिती विभाग)**

---

**विषय नं.१३** **सन २०२६-२८ करीता आरोग्य विभागाकडील नवीन दर्शन रांग कॉम्पलेक्स मधील यांत्रिकीकरणासह हाऊसकिपींग व गार्डनिंगची कामे आऊटसोर्स पध्दतीने करुन घेणेकामी निम्नतम दरधारकास २२ महिनेकरीता कार्यादेश देणेस मान्यता मिळणेबाबत.**

**निर्णय क्र.३११ प्रस्ताव मंजूर.**

**(कार्यवाही-आरोग्य विभाग)**

---

**विषय नं.१४** **साई आश्रम भक्तनिवास, साई धर्मशाळा व व्दारावती भक्तनिवासस्थान या विभागाकडील सन २०२६-२७ या कालावधीसाठी निम्नतम दरधारक यांना लॉण्ड्री कामाचा कार्यादेश देणेस मान्यता मिळणेबाबत.**

**निर्णय क्र.३१२ प्रस्ताव मंजूर.**

**(कार्यवाही-साई आश्रम भक्तनिवास)**

---

**विषय नं.१५** **श्री साई समाधी शताब्दी मंडप या ठिकाणी कार्यक्रम आयोजित केलेल्या साईभक्तांना निवासव्यवस्था मोफत देणेस निर्णय होणेबाबत.**

**निर्णय क्र.३१३ प्रस्ताव मंजूर.**

**(कार्यवाही- साई आश्रम भक्तनिवास)**

---

**विषय नं.१६** **साई आश्रम भक्तनिवास व साईबाबा भक्तनिवासस्थान विभागातील निवासाकरीता येणारे साईभक्तांचे ड्रायव्हर रुमबाबत.**

**निर्णय क्र.३१४ प्रस्ताव मंजूर.**

**(कार्यवाही- साई आश्रम भक्तनिवास)**

---

**विषय नं.१७** **व्दारावती भक्तनिवास विभागाकडील यांत्रिकीकरणासह हाऊसकिपींग, स्वच्छता, पेस्ट्र कंट्रोल फॉगींग, स्वच्छता कामाकरीता राबविणेत आलेली ई-निविदा प्रकीया रद्द करुन नव्याने दैनिक वर्तमान पत्रात जाहिरात प्रसिध्द करुन ई-निविदा मागविणेस मान्यता मिळणेबाबत.**

**निर्णय क्र.३१५ फक्त अनामत रक्कम जप्त करण्यात यावी. प्रस्ताव मंजूर.**

**(कार्यवाही-व्दारावती भक्तनिवास)**

---

**विषय नं.१८ लाडू प्रसाद विभागाकडील जुने ड्रायफ्रुट कोल्ड स्टोअरेज बायबॅक करुन नवीन खरेदी करणेकामी प्राप्त निविदेतील निम्नतम दरधारक मे.एसबीसी कुलींग प्रा.लि. सुरत यांना कार्यादेश देणेस मान्यता मिळणेबाबत.**

**निर्णय क्र.३१६ प्रस्ताव मंजूर.**

**(कार्यवाही-मेकॅनिकल विभाग)**

---

**विषय नं.१९ संस्थानचे भक्तनिवास, साईनाथ रूग्णालय व श्री साई प्रसादालय येथील ३२ लिफ्टचे कॉम्प्रेसिव्ह वार्षिक सर्व्हिस कॉन्ट्रक्ट (CAMC) देणेकरीता निम्नत्तम दरधारक मे.फोनिक्स इलेव्हेटर्स.(इं) प्रा. लि. पुणे यांना कार्यादेश देणेस मान्यता मिळणेबाबत.**

**निर्णय क्र.३१७ प्रस्ताव मंजूर. मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी पुन्हा वाटाघाटी करुन प्राप्त दराबाबत कार्यादेश देण्यात यावा.**

**(कार्यवाही- मेकॅनिकल विभाग)**

---

**विषय नं.२० श्री साई प्रसादालय किचन करीता नविन RXD 850 स्टीम बॉयलर खरेदी करणेकामी निम्नत्तम दरधारक मे. आयकॉन ट्रेडींग कॉर्पोरेशन, कोलकता यांना कार्यादेश देणेस मान्यता मिळणेबाबत.**

**निर्णय क्र.३१८ प्रस्ताव मंजूर.**

**(कार्यवाही- मेकॅनिकल विभाग)**

---

**विषय नं.२१ संस्थानचे समाधी मंदिर व परीसर, कार्यालय, भक्तनिवासस्थाने, दोन्ही रूग्णालये व इतर ए. सी. यंत्रणेचे वार्षिक सर्व्हिस कॉन्ट्रॅक्ट (CAMC) देणेकामी येणा-या खर्चास व त्याकामी ई-निविदा मागविणेस मान्यता मिळणेबाबत.**

**निर्णय क्र.३१९ प्रस्ताव मंजूर. (कार्यवाही- मेकॅनिकल विभाग)**

---

**विषय नं.२२ श्री साईबाबा संस्थान मधील विविध ठिकाणचे जुने स्प्लिट ए.सी. बॉयबॅक करुन नवीन ए.सी खरेदी करण्यास मान्यता मिळणेबाबत.**

**निर्णय क्र.३२० प्रस्ताव मंजूर. शासनाचे GeM पोर्टलवरील दर लक्षात घेऊन ई-निविदा काढण्यात यावी. (कार्यवाही- मेकॅनिकल विभाग)**

---

**विषय नं.२३ साईआश्रम भक्तनिवासस्थान व साई धर्मशाळाकरीता नवीन फायर सिलेंडर खरेदी करणेकामी न्युनतम दरधारक मे.लिटमस इंटरप्रायजेस, भांडूप यांचा कार्यादेश व चालू असलेली कोटेशनव्दारे खरेदी प्रक्रिया रद्द करणेस तसेच नव्याने नामांकित कंपनीचे फायर सिलेंडर खरेदी करणेकामी सुधारित खर्चास मान्यता मिळणेबाबत.**

**निर्णय क्र.३२१ तहकुब.**

**(कार्यवाही-फायर अ‍ॅन्ड सेफ्टी विभाग)**

---

**विषय नं.२४ श्री साई दैनंदिनी/दिनदर्शिका-२०२७ छपाईकामी वाणिज्यीक ई-निविदा प्रक्रियेअंतर्गत पात्र निम्नतम दरधारकांस कार्यादेश देणेस मान्यता मिळणेबाबत.**

**निर्णय क्र.३२२ प्रस्ताव मंजूर.**

**(कार्यवाही-प्रकाशने विभाग)**

---

**विषय नं.२५ श्री साईबाबा डिलक्स (८ पानी) वॉल कॅलेंडर-२०२६ शिल्लक १७०० नग संख्येबाबत.**

**निर्णय क्र.३२३ प्रस्ताव मंजूर.**

**(कार्यवाही-प्रकाशने विभाग)**

---

**विषय नं.२६ श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी व मौजे कनकुरी वाढीव संयुक्त पाणी पुरवठा योजना टप्पा क्र.१ योजनेतील नगर-मनमाड रस्त्याचे रुंदी मधुन समांतर जाणारी डी.आय.पाईपलाईन टाकणे व नगर-मनमाड रस्ता क्रॉसिंग करणे या कामासाठी येणा-या अपेक्षीत रु.४१,२६,८००/-मात्रचे अंदाजपत्रकीय खर्चास व याकामी ई-निविदा मागविणेस मान्यता मिळणेबाबत.**

**निर्णय क्र.३२४ प्रस्ताव मंजूर.**

**(कार्यवाही-पाणी पुरवठा विभाग)**

---

**विषय नं.२७ सन २०२६-२७ करीता एक वर्षाचे कालावधीसाठी पाणी पुरवठा विभागास पाणी शुध्दीकरणासाठी आवश्यक ब्लीचींग पावडर, फेरीक ॲलम, क्लोरीन गॅस सिलेंडर व TCCA-90 क्लोरीन पावडर खरेदी करणेस व त्यासाठी येणारे रु.१९,६४,३००/-मात्रचे अपेक्षीत अंदाजपत्रकीय खर्चास तसेच सदर मटेरिअल खरेदी विभागामार्फत खरेदी करणेसाठी विहीत पध्दतीने ई-निविदा मागविणेस मान्यता मिळणेबाबत.**

**निर्णय क्र.३२५ प्रस्ताव मंजूर.**

**(कार्यवाही- पाणी पुरवठा विभाग)**

---

**विषय नं.२८ संस्थान मौजे–कनकुरी येथील साठवण तलावातील मासे विक्री करणेबाबत.**

**निर्णय क्र.३२६ प्रस्ताव मंजूर.**

**(कार्यवाही- पाणी पुरवठा विभाग)**

---

**विषय नं.२९ सामुदायिक श्री साईसच्चरित विश्व पारायण सोहळा-२०२६ (वर्ष ३२ वे) नेहमीचे प्रथा, परंपरेप्रमाणे साजरा करणेबाबत.**

**निर्णय क्र.३२७ प्रस्ताव मंजूर. साई चरित्राचे वाचन करण्यासाठी व्यासपीठावर संस्थानचे पुजारी घेण्यात यावेत.**

**(कार्यवाही-सामान्य प्रशासन विभाग)**

---

**विषय नं.३० पुजारी व सहायक पुजारी या पदावर कंत्राटी पध्दतीने ११ महिने कालावधीसाठी नेमणूक केलेल्या कर्मचा-यांचे विविध मागण्यांबाबत.**

**निर्णय क्र.३२८ प्रस्ताव मंजूर.**

**(कार्यवाही-सामान्य प्रशासन विभाग)**

---

**विषय नं.३१ सन २०२६ दिपावली निमित्त संस्थान कर्मचा-यांना सानुग्रह अनुदान अदा करणेबाबत.**

**निर्णय क्र.३२९ प्रस्ताव मंजूर. मा.उच्च न्यायालयात सी.ए. दाखल करुन मान्यता घेण्यात यावी तसेच शासनाचे मान्यतेसाठी प्रस्ताव पाठविण्यात यावा.**

**(कार्यवाही-सामान्य प्रशासन विभाग/विधी विभाग)**

---

**विषय नं.३२** श्री. रंगनाथ बन्सी सोनवणे, मदतनीस, आरोग्य विभाग यांचे विभागीय चौकशी अहवालाबाबत.

**निर्णय क्र.३३०** सक्तीने सेवा निवृत्त करण्यात यावे.

(कार्यवाही-सामान्य प्रशासन विभाग)

---

**विषय नं.३३** श्री साईबाबा व श्री साईनाथ रूग्णालयाकरीता लागणारे वार्षीक औषधे, सर्जिकल साहित्य तसेच On Consignment Basis वरील साहित्य इ. खरेदीकामी दर निश्चिती (Rate Contract) करणेकामी पात्र ऑनलाईन कमर्शिअल ई-निविदेतील न्युनतम दरधारकांशी चर्चा /वाटाघाटी करुन पुरवठा आदेश देण्यास व ज्या मटेरीअल करीता पुरवठा आदेश जाणार नाहीत त्याकरीता फेर ई-निविदा प्रक्रिया करण्यास मान्यता मिळणेबाबत.

**निर्णय क्र.३३१** मुळ दरांपेक्षा ज्या औषधांच्या किंमती कमी आहेत त्या वितरकांसोबत वाटाघाटी करुन त्यांना कार्यादेश देण्यात यावा. मुळ दरांपेक्षा ज्या औषधांच्या किंमती जास्त आहेत व वाटाघाटी नंतरही त्या जास्त होत असतील तर त्याचे दर मान्यतेसाठी प्रस्ताव समितीपुढे सादर करावेत.

(कार्यवाही-श्री साईबाबा हॉस्पिटल)

---

**विषय नं.३४** श्री साईबाबा व श्री साईनाथ रुग्णालयाकरीता Fully-Automatic Biochemistry Analyzer Machine चे Reagent खरेदीकामी मशिन विनामुल्य वापरास घेऊन Rental पध्दतीने ५ वर्षाकरीता Rate Contract करणेकामी प्राप्त ऑनलाईन कमर्शिअल ई-निविदेतील न्युनतम दरधारकांशी चर्चा / वाटाघाटी करुन पुरवठा आदेश देण्यास मान्यता मिळणेबाबत.

**निर्णय क्र.३३२** प्रस्ताव मंजूर.

(कार्यवाही- श्री साईबाबा हॉस्पिटल)

---

**विषय नं.३५** श्री साईनाथ रुग्णालयासाठी आवश्यक प्रयोगशाळा सहाय्यक व ज्यु.एक्स-रे टेक्निशियन पदे लेबर ठेकेदारामार्फत बाहयस्त्रोत यंत्रणेव्दारे (आऊटसोर्सव्दारे) भरणेबाबत.

**निर्णय क्र.३३३** प्रस्ताव मंजूर. (कार्यवाही- श्री साईबाबा हॉस्पिटल)

---

**विषय नं.३६ श्री साईबाबा हॉस्पिटल व श्री साईनाथ रुग्णालयातील कर्मचा-यांना गणवेश तसेच रुग्णालयातील रुग्णांकरीता आवश्यक असलेले विविध लिनन ई-निविदा मागवुन विहीत पध्दतीने खरेदी करणेबाबत.**

**निर्णय क्र.३३४ प्रस्ताव मंजूर.**

**(कार्यवाही- श्री साईबाबा हॉस्पिटल)**

---

**विषय नं.३७ बी.एस्सी नर्सिंग अभ्यासक्रम सुरू करणेसाठी आवश्यक क्लिनीकल प्रशिक्षण सुविधा उपलब्ध करून देणेसाठी प्रवरा इन्स्टीटयुट ऑफ रिसर्च ॲन्ड एज्युकेशन इन सोशल नॅचरल सायन्स लोणी व श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था,शिर्डी यांचेमध्ये सामंजस्य करार करणेबाबत.**

**निर्णय क्र.३३५ प्रस्ताव मंजूर.**

**(कार्यवाही- श्री साईबाबा हॉस्पिटल)**

---

**विषय नं.३८ श्रीमती संगीता शशिकांत कुमावत, स्थायी (कायम) परिचारीका, श्री साईबाबा हॉस्पिटल यांचे गैरशिस्त वर्तनाबाबत.**

**निर्णय क्र.३३६ प्रस्ताव मंजूर.**

**(कार्यवाही- श्री साईबाबा हॉस्पिटल)**

---

**विषय नं.३९ श्रीमती निशा मधुकर बारसे, परिसेविका, श्री साईबाबा हॉस्पिटल यांचे गैरशिस्त वर्तनाबाबत.**

**निर्णय क्र.३३७ प्रस्ताव मंजूर.**

**(कार्यवाही- श्री साईबाबा हॉस्पिटल)**

---

**विषय नं.४० संस्थानमार्फत श्री साईसत्यव्रत पुजेच्या शिरा प्रसादाची गुणवत्ता सुधारणे करीता सुका मेवा व हिरवी विलायची समाविष्ट करणेबाबत.**

**निर्णय क्र.३३८ प्रस्ताव मंजूर.**

**(कार्यवाही-मंदिर विभाग)**

---

**विषय नं.४१** **संस्थानमार्फत विविध राज्यांमध्ये श्री साईबाबांचे कार्याचा प्रचार आणि प्रसार करणे तसेच अपप्रचार थांबविणेकामी विविध राज्यांमध्ये किर्तनकार/प्रवचनकर/ प्रबोधनकार व्यक्तींची नेमणुक करणेकामी नियमावली निश्चित करणेबाबत.**

**निर्णय क्र.३३९** **प्रस्ताव मंजूर.**

**(कार्यवाही- मंदिर विभाग)**

---

**विषय नं.४२** **श्री व्दारकामाईचे सभामंडपातील श्रींचे बसण्याच्या दगडी शिळेकरीता नक्षीदार लाकडी मखर देणगी स्विकारणेस व बसविणेस मान्यता मिळणेबाबत.**

**निर्णय क्र.३४०** **प्रस्ताव मंजूर.**

**(कार्यवाही- मंदिर विभाग)**

---

**विषय नं.४३** **श्री साईबाबा क्रिडा संकुलाकरीता क्रिडा साहित्य खरेदी करणेबाबत.**

**निर्णय क्र.३४१** **जिल्हा क्रिडा अधिकारी यांचेकडून तपशिल घेऊन प्रस्ताव समितीपुढे पुन्हा सादर करावा.**

**(कार्यवाही-श्री साईबाबा महाविद्यालय)**

---

**विषय नं.४४** **श्री साई संस्थान एम्प्लॉईज क्रेडीट को.ऑप सोसायटी लि.शिर्डी यांना नवीन दर्शन रांगेच्या ब्रिजखाली पादत्राणेगृहासाठी वापरावयास दिलेल्या जागेच्या वापरास मुदतवाढ मिळणेबाबत.**

**निर्णय क्र.३४२** **प्रस्ताव मंजूर.**

**(कार्यवाही-मालमत्ता विभाग)**

---

**विषय नं.४५** **श्री साई संस्थान एम्प्लॉईज क्रेडीट को.ऑप सोसायटी लि.शिर्डी यांना नवीन दर्शन रांगेच्या ब्रिजखाली मोबाईल कॅमेरा क्लोकरुम वापरावयास दिलेल्या जागेच्या वापरास मुदतवाढ मिळणेबाबत.**

**निर्णय क्र.३४३** **प्रस्ताव मंजूर.**

**(कार्यवाही- मालमत्ता विभाग)**

---

**विषय नं.४६** **संस्थानचे श्री साईनाथ रूग्णालय परिसरात रूग्ण व रूग्णांचे नातेवाईकांच्या सोयीसाठी झेरॉक्स मशिन सुरू करण्यास परवानगी मिळणेबाबत श्री साई संस्थान एम्प्लॉईज क्रेडीट को-ऑप सोसायटी लि, शिर्डी यांचेकडील जा.नं श्री सासंएक्रेसो/१०७/२०२६ दि.०७.०७.२०२६ रोजीचे पत्र.**

**निर्णय क्र.३४४** **प्रस्ताव मंजूर. झेरॉक्स मशिन चालक म्हणून दिव्यांग/ एकल महिला यांना प्राधान्य देण्यात यावे.**

**(कार्यवाही- मालमत्ता विभाग)**

---

**विषय नं.४७** **साईभक्तांचे सेवेसाठी व सोयीसाठी संस्थान परिसर विविध ०७ ठिकाणी चालवत असलेले जागा/ गाळे च्या वापरास पुढील ११ महिने कालावधीसाठी मुदत वाढवून मिळणेबाबत चेअरमन, श्री साई संस्थान एम्प्लॉईज क्रेडीट को-ऑप सोसायटी लि, शिर्डी यांचेकडील पत्र जा.नं श्री सासंएक्रेसो/३५/२०२६ दि.२०.०५.२०२६.**

**निर्णय क्र.३४५** **प्रस्ताव मंजूर.**

**(कार्यवाही- मालमत्ता विभाग)**

---

**विषय नं.४८** **श्री साई संस्थान एम्प्लॉईज क्रेडीट को-ऑप सोसायटी लि.शिर्डी यांना संस्थान परिसरात लिव्ह अॅण्ड लायसन्स तत्वावर वापरावयास दिलेल्या १० कियॉस्क/ गाळे च्या वापरास मुदतवाढ मिळणेबाबत.**

**निर्णय क्र.३४६** **प्रस्ताव मंजूर.**

**(कार्यवाही-मालमत्ता विभाग)**

---

**विषय नं.४९** **साई आश्रम भक्तनिवास परिसरामध्ये दुर्लभ दर्शन केंद्रासाठी लिव्ह अॅन्ड लायसन्स तत्वावर वापरावयास दिलेल्या गाळेच्या वापरास मुदतवाढ मिळणेबाबत.**

**निर्णय क्र.३४७** **प्रस्ताव मंजूर.**

**(कार्यवाही-मालमत्ता विभाग)**

---

**विषय नं.५०** **मौजे शिर्डी ता.राहाता येथील सर्व्हे नं.१९५/४ पै. व सर्व्हे नं.१९५/५ मधील ०.२० आर क्षेत्र रस्त्यासाठी श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी यांनी कायम खरेदी घेणेबाबत.**

**निर्णय क्र.३४८ मुल्यांकन अहवाल घेऊन प्रस्ताव फेर सादर करावा. (कार्यवाही-मालमत्ता विभाग)**

---

**विषय नं.५१** **साई आश्रम भक्तनिवास येथील सर्व इमारतींचे स्कायलाईट डोमचे पॉलिकार्बोनेट शिट बदलणे कामासाठी ठेकेदार मातोश्री इंटेरीयर्स, केडगाव, अहिल्यानगर यांना कुठलीही भाववाढ/ दरवाढ न देता काम पूर्ण करणेसाठी दि.१५/०८/२०२६ अखेर मुदतवाढ देणेसाठी निर्णय होणेबाबत.**

**निर्णय क्र.३४९ प्रस्ताव मंजूर. (कार्यवाही-बांधकाम विभाग)**

---

**विषय नं.५२** **संस्थानचे साईनाथ मंगल कार्यालय व साई उद्यान लगतचे शिर्डी सर्व्हे नं.४/२ ब २ येथे कै. केशव कृष्ण प्रधान यांचे स्मरणार्थ बांधण्यात आलेल्या केशव मंदिराचे साई सेवा म्हणून नुतनीकरण करणेची संधी मिळणेबाबत श्री साई तपोवन स्पिरिच्युअल ट्रस्ट, सेलम, तामिळनाडू यांनी संस्थानकडे दि.१६.१२.२०२५ रोजी प्राप्त झालेल्या पत्राव्दारे केलेल्या विनंतीबाबत.**

**निर्णय क्र.३५० प्रस्ताव नामंजुर. (कार्यवाही-बांधकाम विभाग)**

---

**यानंतर मा.अध्यक्ष महोदय यांचे परवानगीने आयत्या वेळेच्या विषयांवर चर्चा करण्यात आली.**

**आयत्या वेळेचा**

**विषय नं.१** **शिर्डी शहराचे उत्तरेकडील नगर-मनमाड महामार्गालगत असलेल्या नाला क्र.३४ बंदीस्त करुन त्यावर साईभक्तांचे वाहनांकरीता पार्किंग विकसीत करणेचे प्रस्तावास तत्वत: मान्यता देणे तसेच याकामी सल्लागार नियुक्तीसाठी e-RFP प्रस्ताव प्रसिध्द करणेसाठी मान्यता मिळणेबाबत.**

**निर्णय क्र.३५१ पाटंबधारे विभाग यांचे परवानगीस अधिन राहून प्रस्ताव मंजूर.**
**(कार्यवाही-बांधकाम विभाग)**

---

**आयत्या वेळेचा**

**विषय नं.२** **श्रींचे समाधी मंदिरात दोन्ही बाजुने देणगी स्वरुपात सोन्यामध्ये स्वस्तिक स्विकारणे व बसविणेस परवानगी बाबत.**

**निर्णय क्र.३५२** **प्रस्ताव मंजूर.** **(कार्यवाही-मंदिर विभाग)**

---

**आयत्या वेळेचा**

**विषय नं.३** **श्री साईबाबांचे कार्याचा व शिकवणूकीचा दहा वर्ष किंवा अधिक काळापासून विविध राज्यांमध्ये मासिकांच्या माध्यमातून प्रचार आणि प्रसार करणा-या साईभक्त संपादकांना मानधन देणेबाबत.**

**निर्णय क्र.३५३** **मासिक, व्दैमासिक, त्रैमासिक, साप्ताहिक, पाक्षिक मधुन फक्त साईबाबांच्या कार्याचा प्रचार आणि प्रसार करणा-या संपादकांना मानधन देण्याबाबतचा प्रस्ताव मंजूर.** **कार्यवाही-मंदिर विभाग)**

---

**आयत्या वेळेचा**

**विषय नं.४** **माहे जून-२०२६ जमा-खर्चाची नोंद घेणेबाबत.**

**निर्णय क्र.३५४** **नोंद घेतली.** **(कार्यवाही-लेखाशाखा)**

---

**वरील निर्णय क्र.२९९ ते ३५४ सर्वानुमते घेण्यात आले.**
**यानंतर सायं.५.०० वा. सभा समाप्तीची घोषणा करण्यात आली.**

स्वाक्षरीत/-
**(गोरक्ष गाडीलकर, भा.प्र.से.)**
**मुख्य कार्यकारी अधिकारी तथा**
**सदस्य, तदर्थ (Ad-hoc) समिती,**
**श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी.**

स्वाक्षरीत/-
**(डॉ. पंकज आशिया,भा.प्र.से.)**
**जिल्हाधिकारी, अहिल्यानगर तथा**
**सदस्य, तदर्थ (Ad-hoc) समिती,**
**श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी.**

स्वाक्षरीत/-
**(शिवाजी कचरे)**
**प्रमुख जिल्हा व सत्र न्यायाधीश, अहिल्यानगर तथा**
**अध्यक्ष, तदर्थ (Ad-hoc) समिती,**
**श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी.**